विभागातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाज पार पाडताना घ्यावयाची खबरदारी.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्र.वाटप-२०१७/प्र.क्र.१८/नोंदणी शाखा,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २७ डिसेंबर, २०१७

संदर्भ:-१) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक, संकीर्ण-२०१४/प्र.क्र.८०/१८(र.व.का.), दि.३१ डिसेंबर, २०१४
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक, संकीर्ण-२०१४/प्र.क्र.८०/१८(र.व.का.), दि.३१ ऑगस्ट, २०१६
३) विभागाचा कार्यालयीन आदेश क्र. वाटप-२०१७/प्र.क्र.२८/नोंदणी शाखा, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७

प्रस्तावना:-

शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील काही चतुर्थश्रेणी कर्मचारी नेमून दिलेले कामकाज पार न पाडता कामात टाळाटाळ व कुचराई करत असल्याबाबत त्याचप्रमाणे, हवालदार आणि कक्ष अधिकारी (नोंदणी शाखा) यांना कोणतीही पूर्वसूचना न देता कार्यालयात वारंवार गैरहजर राहत असल्याबाबत निदर्शनास आले आहे. यामुळे विभागातील कार्यालयीन कामकाज विस्कळीत होत असून विभागातील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांकडून याबाबत नोंदणी शाखेकडे वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

२. विभागाचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव तसेच एखाद्या उपविभागाचे सह/उपसचिव रजेवर अथवा दौऱ्यावर असल्यास तेथील कार्यरत चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी कक्ष अधिकारी (नोंदणी शाखा) आणि हवालदार यांनी नेमून दिलेले कामकाज करणे अनिवार्य राहील अशा सूचना संदर्भाधीन क्र.३ येथील आदेशान्वये देण्यात आलेल्या आहेत. तथापि, अद्यापही काही चतुर्थश्रेणी कर्मचारी उद्धटपणे कामकाज करण्यास नकार देत असल्याबाबतही निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने विभागातील सर्व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना सक्त सूचना देण्याबाबत विभागाच्या विचाराधीन होते.

शासन परिपत्रक :-

वरील सर्व बाबींचा जाणीवपूर्वक विचार करून सर्व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी खालीलप्रमाणे खबरदारी घेणे आवश्यक आहे.

१) सर्व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी सकाळी ९.३० ते संध्याकाळी ६.१५ वा. या कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून नेमून दिलेले कामकाज पार पाडणे अनिवार्य आहे. तथापि, बहुसंख्य वर्ग-४ चे कर्मचारी दि.३१.१२.२०१४ च्या संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदीचा आधार घेऊन सकाळी विलंबाने येतात व संध्याकाळी उशीरापर्यंत थांबतात. तथापि, अधिकारी/कर्मचारी सकाळी वेळेवर कार्यालयात आल्यास त्यांना वर्ग -४ कर्मचाऱ्यांची सेवा प्राप्त होत नाही. परिणामी कामकाजावर प्रतिकूल परिणाम होतो. सबब, वर्ग-४ कर्मचाऱ्यांना, नोंदणी शाखेचे अधिकारी व हवालदार यांना अगोदरच्या दिवशी पूर्वकल्पना देऊनच दुसऱ्या दिवशी त्या सवलतीचा लाभ घेता येईल. पूर्वकल्पना

न देता कार्यालयात सकाळी ९.३० नंतर आल्यास विलंब समजून अर्ध्या दिवसाची नैमित्तिक रजा कापण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२) मुख्यालय सोडून इतर कार्यालयात शासकीय कामकाजाकरिता जायचे असल्यास त्याबाबतची सूचना हवालदार आणि नोंदणी शाखा प्रमुख यांना द्यावी.

३) सर्व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी रजा घेताना नोंदणी शाखेचे कक्ष अधिकारी व हवालदार यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील किंवा अपवादात्मक परिस्थितीत अचानक रजा घेतल्यास त्याबाबत दूरध्वनीवरुन अवगत करणे अनिवार्य राहील. अन्यथा (खात्यावर रजा शिल्लक असली तरी) सदर रजा असाधारण समजून त्या रजेचे वेतन अदा करण्यात येणार नाही.

४) रितसर मंजूर करण्यात आलेली रजा संपल्यानंतर परवानगीशिवाय परस्पर रजा वाढवून घेता येणार नाही.

५) जे चतुर्थश्रेणी कर्मचारी कारणाशिवाय किंवा अल्प कालांतराने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करुन कार्यालयात वारंवार अनुपस्थित राहतील त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३२, नियम ४० आणि नियम ४१ नुसार वैद्यकीय मंडळासमोर तातडीने उपस्थित राहणे आवश्यक राहील.

वैद्यकीय मंडळाने सेवेत रुजू होण्यास पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतरही जर संबंधित कर्मचारी सेवेत रुजू होत नसेल अगर संबंधित कर्मचारी वैद्यकीय मंडळासमोर उपस्थितच राहत नसेल तर त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९८९ अंतर्गत शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

६) सर्व वर्ग -४ कर्मचाऱ्यांना नोंदणी शाखेचे कक्ष अधिकारी व हवालदार यांनी नेमून दिलेले कार्यालयीन कामकाज पार पाडणे अनिवार्य असेल. कोणत्याही चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यास कोणत्याही परिस्थितीत सदर कामकाज पार पाडण्यास टाळाटाळ करता येणार नाही.

७) विभागातील नेमून दिलेल्या कार्यासनातील अधिकारी तसेच कर्मचारी यांनी सांगितलेले कार्यालयीन कामकाज पार पाडणे अनिवार्य आहे. त्यात टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास व संबंधित अधिकारी तसेच कर्मचारी यांची लेखी तक्रार आल्यास, सदर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७१२२८१२२२४५४७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल व यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Ravindra
Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2017.12.28 12:28:49 +05'30'

(र.प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी,

१) विभागातील सर्व अधिकारी व सर्व कार्यासने
२) विभागातील सर्व चतुर्थश्रेणी कर्मचारी
३) निवडनस्ती (नोंदणी शाखा)